**म्हाडा कार्यालयास राज्य शासकीय**
**कार्यालयांप्रमाणे पाच दिवसांचा**
**<u>आठवडा लागू करण्याबाबत.</u>**

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण
गृहनिर्माण भवन, वांद्रे [ पूर्व ] मुंबई -४०००५१.
क्र.प्राधि/समय/२०२०/E-529 /प्र-१५
दिनांक 26 FEB 2020

**संदर्भ:-** सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र.समय-२०१६/प्र.क्र.६२/१८ (र.व.का.), दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०.

**परिपत्रक**

शासनाच्या संदर्भाधिन दि.२४ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या शासन निर्णयानुसार दि.३१ ऑगस्ट, १९८८ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन संदर्भाधिन शासन निर्णय त्यातील तरतुदींच्या अधीन राहून प्राधिकरणाच्या कर्मचा-यांना लागू करण्यास मा.उपाध्यक्ष/ प्रा. यांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

१) दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पासून म्हाडा कर्मचाऱ्यांना पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात येत असून त्यामुळे सर्व शनिवार व रविवार हे सुट्टीचे दिवस असतील.
२) म्हाडा कार्यालयाची कामकाजाची वेळ ४५ मिनिटांनी वाढविण्यात येत असून ती सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी राहील.
३) म्हाडा कार्यालयातील शिपायांसाठी कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० अशी राहील.
४) उपरोक्त कार्यालयीन वेळेमध्ये दिनांक ४ जून, २०१९ च्या शासन परिपत्रकानुसार दुपारी १.०० ते २.०० या वेळेमधील जास्तीत जास्त अर्ध्या तासाची भोजनाची सुट्टी अंतर्भुत असेल.

सदरहू परिपत्रक सर्व अधिकारी/कर्मचारी यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

**(प्रसाद उकर्डे)**
**सचिव/प्राधिकरण**

**प्रत माहितीसाठी**
१. मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.

कृ.मा.प.

२. मा.मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ/मुं.इ.दु. व पु. मंडळ,
३. मुख्य अभियंता-१/२/३/प्रा.
४. विधी सल्लागार/प्रा.
५. वित्त नियंत्रक /प्रा.
६. उपमुख्य कार्यकारी अधिकारी /प्रा.
७. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/प्रा.
८. मुख्य अधिकारी, मुं झो सु मंडळ/कोकण मंडळ/पुणे मंडळ/
नाशिक मंडळ/नागपूर मंडळ/औरंगाबाद मंडळ/अमरावती मंडळ
९. उपमुख्य अभियंता, दक्षता व गुणनियंत्रक कक्ष /प्रा.
१०. चौकशी अधिकारी /प्रा.
११. सक्षम प्राधिकारी-१/२
१२. मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा.
१३. मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.

**प्रत माहितीसाठी**

१. सहमुख्य अधिकारी/मुं.मंडळ/मुं.इ.दु.व पु. मंडळ
२. प्रशासकीय अधिकारी/प्रा./मुं.मंडळ/मुं.इ.दु.व पु. मंडळ/मुं.झो.सु.मंडळ/ कोंकण मंडळ/
पुणे मंडळ/नागपूर मंडळ/ अमरावती मंडळ/ नाशिक मंडळ/ औरंगाबाद मंडळ.

**प्रत माहितीसाठी :-**

१. मा. अध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहायक
२. मा. उपाध्यक्ष/ प्रा. यांचे स्वीय सहायक
३. मा.सभापती/मुं.इ.दु.व पु. मंडळ/मुं.झो.सु.मंडळ/नाशिक मंडळ/
नागपूर मंडळ यांचे स्वीय सहायक.
४. अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
५. प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना
६. अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई.

प्रत: प्रशासन-११,१४/प्रा.

✓प्रत: मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी – यांना म्हाडा संकेतस्थळावर
अपलोड करणे करीता.